# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

**फोन नं.(०२०) २६०५०६४१** **ई-मेल आयडी :-** sceapune@gmail.com

जा.क्र.रासनिप्रा/जि.म.सह.बँ./निवडणुक मा.सु./२०१५/476
दिनांक 14/1 /२०१५

प्रति,
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक

**विषय : जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची प्राथमिक मतदार यादी तयार करणेसंबंधात अनुसरावयाच्या सर्वसाधारण मार्गदर्शक सुचना**

**वाचा :** महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम २०१४

उपरोक्त विषयाकडे आपले लक्ष वेधण्यात येऊन कळविणेत येते की,

२/- जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक यांचेकडुन जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संस्था सभासदांची (DCCB) त्यांचेकडे प्राप्त झालेले प्रतिनिधीचे ठरावानूसार यादी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेस प्राप्त होणार आहे. ती प्राप्त झालेनंतर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम २६(१), २७ व ७३ कअ चे तरतुदीनुसार सदर प्राप्त प्रतिनिधींचे यादीची छाननी करुन छाननीअंती उक्त कलमांचे अनुपालन करणाऱ्या संस्थांची इ-३ व इ-३(१)नमुन्यात प्राथमिक मतदार यादी तयार करावी. त्यासाठी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने त्यांचे सभासद संस्थांकडुन खालील बाबी प्राप्त करुन घेतल्यास त्यांना छाननी करणे सुकर होईल.

१. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे सभासद असणा-या परंतु थकित असणा-या प्राथमिक विकास सहकारी संस्थांची यादी
२. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे सभासद असणा-या परंतु थकित असणा-या प्राथमिक विकास सहकारी संस्थांचे संचालक मंडळाची यादी
३. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे सभासद असणा-या प्राथमिक विकास संस्थांच्या थकबाकीदार सभासदांच्या याद्या
४. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे सभासद असणा-या परंतु थकित असणा-या इतर सभासद सहकारी संस्थांची यादी
५. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे सभासद असणा-या परंतु प्राधिकृत अधिकारी/ प्रशासक म्हणून नियुक्त झालेल्या सहकारी संस्थांची यादी
६. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे सभासद असणा-या परंतु अवसायनात असणा-या सहकारी संस्थांची यादी

संबंधीत जिल्हा सहकारी बँकेने अशा प्रकारे प्राथमिक मतदार यादी अचूक, निर्दोष व नियमानूसार घेण्यासाठी ज्येष्ठ, माहितगार अधिकाऱ्यांचा एक कक्ष तयार करावा व अशा कक्षाने विभागीय सहनिबंधक तथा जिल्हा सहकारी निवडणूक अधिकाऱ्यांकडून प्रतिदिन प्राप्त होणाऱ्या प्रतिनिधी/ ठरावाची अचूक पध्दतीने छाननी करुन progressive मतदार दैनंदिन तयार करावी जेणेकरुन ठराव प्राप्त होणाऱ्या शेवटच्या दिवशी किंवा पुढील दिवशी ही यादी जिल्हा सहकारी निवडणूक अधिकाऱ्याकडे प्राथमिक मतदार यादी म्हणून प्रसिध्दीस पाठविणे शक्य होईल. उपरोक्तप्रमाणे उपलब्ध करुन घेतलेल्या बाबी वरुन छाननी अंती प्राप्त प्रतिनिधींचे ठरावांची खात्री करुन इ-३ व इ-३(१) नमुन्यातील प्रारुप मतदार यादी DCCB ने तयार केल्यास सदर यादी निर्दोष अचूक होण्यास मदत होईल.

त्यामुळे DCCB ने उपरोक्तप्रमाणे कृती गांभिर्याने करुन प्रारुप मतदार यादी सादर करणेची दक्षता घ्यावी.

**मा.आयुक्त, राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, पुणे यांच्या आदेशानुसार.**

**(डॉ.आनंद जोगदंड)** 14/1/15
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य , पुणे.

**प्रत माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव :-**
१ . विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (सर्व).
२. जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी (सर्व).
३. तालुका / प्रभाग सहकारी निवडणुक अधिकारी (सर्व).